# महाराष्ट्र शासन

अतितात्काळ/न्यायालयीन प्रकरण

**क्र:याचिका/२०१८/प्र.क्र.१६२/काम-७**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८.०९.२०१८.

प्रति,

**आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

**आयुक्त,**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
मुंबई.

**उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
(म्हाडा), मुंबई.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण,
मुंबई.

**विषय:- मा.सर्वोच्च न्यायालय, सुमोटो क्र. १/२०१५ च्या याचिकेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्दयाची माहिती मिळणेबाबत.**

महोदय,

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी घेतलेल्या सुमोटो क्र. १/२०१५ च्या याचिकेच्या अनुषंगाने दिलेल्या आदेशाचे कृपया अवलोकन करावे. (प्रत संलग्न)

२. सदर पत्रान्वये कळविण्यात येते की, आपल्याकडे नोंदणीकृत असलेले विकासक, ठेकेदार व त्यांच्याकडे काम करत असलेले बांधकाम कामगार यांची नोंदणी उपायुक्त कामगार, (मुंबई शहर), उपायुक्त कामगार, (मुंबई उपनगर पुर्व) आणि उपायुक्त कामगार, (मुंबई उपनगर पश्चिम) यांचेकडे तात्काळ करावी. त्यासाठी त्यांना सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्तरावरुन वेगळ्याने सूचना दिलेल्या आहेत.

३. केलेल्या कार्यपुर्तीचा अहवाल दिनांक ०३.१०.२०१८ पर्यंत या विभागास ई-मेलद्वारे (shashank.sathe@nic.giv.inकिंवा dattatray.dange@nic.gov.in)या ई-मेल आयडीवर उपलब्ध करून द्यावा, ही विनंती.

आपला,

(द.य. डांगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- (निवडनस्ती कामगार-७)